**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक :- २३३** **दिनांक :- २७/०८/२०२१**

## बनावट गुप्तचर अधिका-यास नयानगर पोलीसांकडून अटक

दिनांक २५/०८/२०२१ रोजी रात्री २३:१५ वाजताचे सुमारास नयानगर पोलीस स्टेशन अंतर्गत शांतीनगर पोलीस चौकी येथे कर्तव्यावर असणारे पोशि/३४०७ नारायण घुगे व पोशि/ १८३८ स्वप्निल तायडे हे जेवण करीत असतांना संशयित नामे सिदधार्थ पांडुरंग येडेरी याने पोलीस चौकीमध्ये जावुन जोराने आरडा-ओरडा करुन, 'तुम्ही रेल्वे स्टेशन जवळील सर्व दुकाने बंद केली आहे व इतर ठिकाणी दुकाने चालु आहेत ती कोण बंद करणार? आणि तुम्ही येथे जेवण करत बसलेले आहेत.' असे बोलुन पोलीसांचा हात पकडुन तु आत्ताच खाली चल, तुला माहित आहे का, मी कोण आहे? असे बोलुन पोलीसांसोबत विनाकारण वाद घालुन पोलीसांना धक्का बुक्की केली. सदर इसमास पुढिल कारवाईकामी पोलीस ठाण्यात आणुन त्याची वैदयकिय तपासणी केली व त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करीत असताना सदरची कारवाई टाळावी म्हणुन तो भारत सरकार गृहमंत्रालय यांचेकडील आय. बी. (गुप्तचर) अधिकारी असल्याचे कर्तव्यावरील पोउपनि. सुहेल पठाण यांना सांगुण त्याचेकडे असलेले ओळखपत्र दाखवीले. नुमद व्यक्तीबाबत संशय आल्याने ओळखपत्राची पडताळणी केली असता त्याने सादर केलेले ओळखपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आले. सदर बाबत पो.उप.निरी सुहेल पठाण यांनी दिलेल्या तक्ररीवरुन नयानगर पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. ४७५/२०२१ भा.द.वि. कलम ३५३, ३३२, १७०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी नामे सिदधार्थ पांडुरंग येडेरी वय ४१, रा. सी/ ३०८, क्लस्टर ०३, मिरा रोड पुर्व ता. जि. ठाणे व त्यास बनावट ओळखपत्र बनवुन देणारा आरोपी क्र ०२ देवेन्दकुमार केशव मांजी वय ५१, यांना अटक करण्यात आलेली आहे. यातील आरोपी क्र ०१

सिदधार्थ पांडुरंग येडेरी याचेकडुन ०४ बनावट ओळखपत्रे, ०३ मोबाईल हॅन्डसेट, ०२ बँक पासबुक, ०१ पासपोर्ट, इंडियन आर्मिचे चिन्ह असलेली फ्रेम व इतर मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपींबाबत पडताळणी केली असता यातील आरोपीत क्र ०१ याचेवर जुहु पोलीस ठाणे, मुंबई व आरोपी क्र ०२ याचेवर वसई, विरार व पुणे येथे गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळून आली असुन आरोपीतांना मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना दि. ३०/०८/२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त् (मख्यालय), श्री अमित काळे पोलीस उपायुक्त परिमंडळ ०१ व डॉ. श्री. शशिकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि श्री. जितेन्द्र वनकोटी, पोनि जिलानी सय्यद, पो.उप.नि सुहेल पठाण यांनी केली असुन पुढील तपास पो.उप.नि. निखिल चव्हाण हे करीत आहे.

-----ooo-----